REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# सावित्रीबाई : ' अग्रदूत होती म्हणून आम्ही घडलो' ...

**कुमारी उर्मिला वसंत लंबे**
**शिक्षण बी.ए, डी.एड.सहशिक्षिका, श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला, सोलापूर.**

जयाशी भाग्य येणार बहुत ।
त्याशी चिन्हे आधीच दिसत ।
सूर्या आधी उगवत । अरुण परेणे ।




हे अगदी खरे घडले एका क्रांतीज्योतीच्या जन्माने. खितपत पडलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी ज्यांनी आपल्या जीवाने रान केले... जेव्हा समाज स्पृश्य अस्पृश्य अशा प्रकारच्या दलदलीमध्ये अडकून पडला होता... शूद्र आणि स्त्रियांनी जगणे म्हणजे जणू एका प्रकारचा श्रापच होता त्या काळात... स्त्री उद्धारक, समाज परिवर्तन करणारी, स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देणाऱ्या तेजस्वी अशा सावित्रीचा जन्म 3 जानेवारी १८३१ रोजी नायगाव येथे झाला

शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी... या उक्तीप्रमाणे खंडोजी नेवसे पाटील आणि लक्ष्मीबाई या भाग्यवान दांपत्यांच्या पोटी सावित्रीचा जन्म झाला. नायगाव हे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात शिरवळ पासून तीन मैलावर असलेले गाव आहे. पुण्यापासून ते तसे जवळच पश्चिमेस व दक्षिणेस डोंगराळ असलेल्या सह्याद्री पर्वताचा शंभू महादेव हा फाटा आढळतो. अंबाबाईच्या देवळामुळे याच ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. गावांमध्ये अनेक देवी-देवतांची देवळे आहेत. त्यामुळे गावातील भाविक सात्विक समाधानाने नांदणारे होते. अनेक परंपरा ही या गावाला लाभल्या आहेत. पेशवे काळातील एक इनामदार घराणे म्हणून नेवासे पाटील यांचे घराणे प्रसिद्ध होते. तेराव्या शतकातील देवगिरीचा राजा रामदेव राम जाधव यांच्या कारकिर्दीत म्हैसमाळ,वेरूळ,सिंदखेड, चिखलठाण आधी गावांची काही तरुण मंडळी फौज-फाट्या मध्ये मानाच्या जागेवर होती. राज लयास गेल्यानंतर ती विखुरली गेली. त्यातीलच एक नेवासेपाटील घराणे होय.

नायगावाची जमीन तसेच सुपिक असल्याने गावकरी सुखी समाधानी होते. खंडोजी नेवसे पाटील हे पंचक्रोशीत आदराचे, आत्मीयतेचे आणि न्यायाचे स्थान म्हणून ओळखले जायचे.लोकांना अडीअडचणीला मदत करणे, गोरगरिबांना मदत करणे हे त्यांच्या स्वभावातच होते त्याचप्रमाणे ते धिप्पाड शरीरयष्टीचे, अतिशय कष्टाळू व मेहनती होते. आई सुंदर व

आध्यात्मिक स्वरूपाची होती. अशा या आई-वडिलांच्या पोटी सुंदर, कणखर, विद्वान,विदुशी अंगापिंडाने भक्कम निरोगी वृत्तीची, समाधानी आणि दूरदृष्टी असलेली सावित्री ही आई वडिलांची लाडकी लेक होती. सिद्धूची, सखाराम व श्रीपती हे त्यांच्या भावांची नावे होत. सावित्रीबाईंचा जन्म झाला तेव्हा आपल्या घरी लक्ष्मी जन्मा आली धनाच्या पेटीने जन्म घेतला. म्हणून आनंदाने त्यांच्या आई-वडिलांने गावभर साखर वाटली पंचक्रोशीत आनंदी आनंद झाला. घरची परिस्थिती चांगली असल्यामुळे लहानपणापासूनच त्यांना कशाचीही उणीव जाणवली नाही. आई-वडिलांनाही भरभरून प्रेम दिले. पाटलाची लेक म्हणून अगदी गावभर सावित्रीचे कौतुक केले जायचे. बालपणाच्या बाल लीला बघून आई-वडील कृतज्ञ झाले होते. तिच्या मधील चमक ही जणू त्यांना तिच्या माहेरकडूनच मिळाले होते. खंडोजी पाटील गावातील समस्या सोडवत शिवाय पंचक्रोशातील विविध तंटे भांडणे ती अगदी सराईतपणे सोडवत असे म्हणतात ना मुलगी दोन्ही घरचा दिवा असते आणि दोन्ही घरच्या परंपरा ती पुढे जोपासत असते. त्याचप्रमाणेच तिने माहेरकडील समाजसेवा तर सासरी पतीकडून मिळलेल्या शिक्षणाचे व्रत पुढे चालूच ठेवले. वडीलाबरोबर त्या शेतात जायच्या मुला मुली बरोबर खेळायच्या स्वयंपाकात ताईला मदत करायच्या, त्या कष्टाळू होत्या त्याचबरोबर त्यांच्या मनामध्ये एक स्त्री मनाची कोमल नाती जपली जात होती.



सावित्रीबाईंच्या जन्माच्या वेळेचा काळ स्त्री अस्पृश्य, शेतकरी, कष्टकरी लोकांसाठी अतिशय वाईट काळ होता. पेशवाई संपुष्टात येऊ लागली होती तर इंग्रजांचे वर्चस्व वाढत चालले होते. अशा या काळात हजारो वर्षापासूनची स्त्री-पुरुष अस्पृश्य अशा दोन्हींमध्ये समाज विभागलेला होता. अशा बिकट काळात सावित्रीबाईंनी जणू समाजाला उजळून टाकण्यासाठी जन्म घेतला होता. तो काळ म्हणजेच 'स्त्री एक उपभोग्य वस्तू आहे' इतकीच स्त्रिची ओळख असणारा होता. रांधा, वाडा, उष्टी काढा चूल...आणि मुल... यात जखडलेल्या स्त्रियांकडे पाहूनच सावित्रीबाईंनी समाजासाठी त्यांचे संपूर्ण जीवन समर्पित केले. धर्म, संस्कृती, परंपरा यांचे बीजे समाज मनात खोलवर रुजलेली होती. स्त्रियांची कामे घरकाम करणे, मुलांना जन्म देणे, सांभाळणे, शेती व इतर कामात मदत करणे इतकीच होती. अर्थातच ती शारीरिक पातळीवरच गृहीत धरलेली होती. आणि बुद्धीचा आणि गुणांचा विकास होणार नाही. याची काळजी घेतल्या जात होत्या वरवर पाहिल्यास ती एक न्यायपूर्ण व सोयीचे व्यवस्था वाटेल पण तिने एक उतरंड निर्माण केली होती .स्वाभिमान, आत्मगौरव, ईच्छा ,आत्मविश्वास स्वातंत्र्य स्वावलंबन या माणसाच्या नैसर्गिक इच्छा मारल्यावर माणसाचा जो कोंडमारा होतो, त्याला स्त्री बळी पडली आहे. स्त्री ही माणूस आहे म्हणून व्यक्ती या स्वरूपात तिचा स्वीकार झाला नाही, तर स्त्रिचे पुरुषासोबत असणारे संबंध यावरच तिची भूमिका ठरवण्यात आली होती स्त्री विषयक सत्य मात्र त्याउलट आहे. भारतीय परंपरेत अध्यात्म असे सांगते की स्त्री ही वासनेचे आगार आहे पुरुषाला मोक्षाची प्राप्ती करायची. असेल तर त्याला प्रथम स्त्रिसंग परित्याग करावा लागतो म्हणजे उपभोगून झाले की तिला सरळ बाजूला फेकून द्या किंवा तिच्याबद्दल तुच्छतेची भावना मनात बाळगून तिच्यासोबत वर्तन करा. धर्मशास्त्राचा जणू असाच आदेश होता.

स्त्री पुरुष दोघेही समान आहेत आणि म्हणून पतीदेव वगैरे सगळं चुकीचं आहे हा विचार समोर आला. निर्मिती हा स्त्रीच्या जीवनाचा भाग सोडला तर मनुष्य म्हणून असलेल्या सर्व क्षमता स्त्रीमध्ये आहेत स्त्री म्हणून त्या वेगळ्या असल्यातरी समपातळीवर त्या समान आहेत. किंबहुना निर्मिती क्षमतेमुळे त्यांच्याकडे गर्भाशय हा अवयव अधिकचा असल्याने त्या तर श्रेष्ठ ठरतात. शरीरिक दुबळेपणा, सौंदर्य इत्यादी गोष्टी संस्कृतीने आरोपीत केलेल्या आहेत म्हणून त्या वरवरच्या आहेत. स्त्रिलाही स्वतःची ओळख पटणे स्वविकास स्वातंत्र्य याची गरज आहे. स्वतःची ओळख स्वायत्तता, सक्रिय सहभाग या स्त्रिला व्यक्ति म्हणून परिपक्व बनवतात. या अशा आपल्या समाजातील विचारसरणीमुळे स्त्री जेव्हा स्वतःविषयी मी कोण? आहे मला काय हवे आहे? मी काय होऊ शकते? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सावित्रीबाईंनी प्रथमता स्वतःला सक्षम केले. आणि नंतर संपूर्ण स्त्री जातीला सामर्थ आणि सबळ करण्याचे व्रत्त त्यांनी हाती घेतले. भारतात स्त्रिविरुद्ध पुरुष अशी भावना नसून स्त्रियांच्या उद्धाराचे काम पुरुषांनी सुरू केले. भारतात कुटुंब व्यवस्थेला महत्त्व असल्याने पिता, भाऊ, पती, मामा, काका, आजोबा इत्यादी नाते संबंधातून स्त्री विकास कार्याचे मार्ग खुले झाले. व्यक्ति हितापेक्षा व्यापक समाजहिताची परंपरा भारतामध्ये असल्याने स्त्री विषयीचे विचार हे इतरापेक्षा थोडेसे वेगळे आहेत, हे आपल्याला दिसून येते. त्या राक्षसांचा संहार करणाऱ्या देवीचे रूप असतील किंवा वेदकाळात गार्गी मैत्रीय यासारख्या ब्रह्मवादीने स्त्रिया असतील यांची ओळख आपल्याला त्यांच्या कर्तृत्वातून दिसून येते. राज घराण्यातील किंवा स्वातंत्र्य लढाईतील जिजाबाई, ताराबाई, अहिल्याबाई, चांदबिबी, राणी लक्ष्मीबाई, रजिया सुलतान यांचे उदाहरणे आपल्यासमोर आहेत. मध्ययुगीन काळातील स्त्रियांनी आपली भूमी पावन केली. त्यामध्ये मुक्ताबाई, जनाबाई, विठाबाई, कान्होपात्रा यांच्या आध्यात्मिक अभंगाच्या रचनेतून त्यांचे प्रगल्भता त्यांची बौद्धिक क्षमता आपल्या लक्षात येते. पुढे हळूहळू मध्ययुगीन काळापासून स्त्री जातीला जास्त दाबून ठेवण्यात आले होते. काही धार्मिक गोष्टी काही अनिष्ट रूढी यामुळे त्या फक्त जिवंत होत्या. जगणे जणू त्या विसरल्या होत्या अशा त्या काळात एकोणिसाव्या शतकात उत्तरार्धात निर्माण झालेल्या प्रबोधन योगाने स्त्री उद्धाराचा विचार व कृती यांना गती प्राप्त झाली. या काळामध्ये अनेक समाजसुधारक पुढे आले. अनेक वैचारिक व कृतिशील चळवळी उभ्या राहिल्या आणि स्त्री अस्पृश्य यांच्यासाठी समाजामध्ये एक स्थान निर्माण करण्यासाठी त्यांनी आपल्या उभ्या आयुष्याचे रान केले. अशाच एका क्रांतीचा जन्म झाला आणि तिने सर्व स्त्रियांचा उद्धार केला. अर्थातच त्या आहेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. ज्यांनी स्त्रियांना थाट मानेने जगायला आणि आत्मसन्मानाने जगायला शिकवले, म्हणूनच आज त्या सर्व स्त्री वर्गामध्ये वंदनीय ठरल्या आहेत.

ज्योतिबा फुले यांची आत्या अर्थात गोविंदरांवाची मावस बहीण सगुणाबाई क्षिरसागर या धनकवडी गावच्या रहिवाशी आणि त्याच गावात मागच्या प्रकरणात पाहिल्याप्रमाणे नेवसे पाटील रहात होते. हे नेवसे पाटील म्हणजेच सावित्रीबाईंचे वडील. सगुणाबाईंच्या दोन्हीकडील नात्याचा परिणाम म्हणून ५ शके १७६८ (इ.स. १८४०) रोजी नायगाव जि. सातारा या ठिकाणी सावित्रीबाई आणि जोतिराव फुले यांचा विवाह संपन्न झाला. विवाहाच्यावेळी ज्योतीरावांचे वय १३ तर सावित्रीबाईंचे वय ९ वर्षे इतके होते.

अवघ्या नऊ वर्षाची सावित्री सोनपावलांनी फुले यांच्या घरात आली. निरागस असणारी सावित्री आता एका नवीन आयुष्यामध्ये रंग भरणार होती. परंतु हे रंग काही साधेसुधे नव्हते. अगदी इंद्रधनुष्याप्रमाणे सूर्याच्या तेजामध्ये झळाळून निघणारे होते. दोन महान व्यक्तीचे मिलन असणार होते ते. या दोघांचा संसार म्हणजेच संपूर्ण स्त्रीजाती आणि अस्पृष्य जातीच्या उद्धाराची सुरूवात होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

माहेराहून येताना ज्या मुलीने एखादे पुस्तक आणले असेल तर कल्पना करा की तिला शिक्षणाची किती आवड असेल. दिवसभर शेतातली कामं करून मिळालेल्या वेळात सावित्री आणि सगुणा यांची शाळा भरत असे. शिकण्यासाठी कोणतेही साधन नसताना त्यांनी शेताला आपली पाटी आणि झाडाच्या फांदीला लेखनी बनवलं.

विवाहानंतर ज्योतिरावांनी सावित्रीबाईंना घरी शिकवून तयार केले आणि त्या पहिल्या महिला शिक्षिका बनल्या. सावित्रीबाईंनी त्यावेळी घराबाहेर टाकलेले पाऊल म्हणजे युगाचा नवीन आरंभच होता. त्यांनी मिचेलबाईंच्या नॉर्मन स्कूलमध्ये अध्यापनाचे प्रशिक्षण घेतले. त्यामुळे सावित्रीबाई या पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका व मुख्याध्यापिका ठरल्याचे दिसून येते. स्त्री-शुद्रातिशुद्रांची पहिली शैक्षणिक चळवळ सुरू केल्याबद्दल एका अनामिक समकालिकाने दि. २५ मार्च १८५३ रोजीच्या दि पुना आब्जर्व्हर अँड डेक्कन विकली मध्ये असे म्हटले आहे की 'है काम म्हणजे हिंदू संस्कृतिच्या इतिहासातील एका नवीन युगाचा आरंभ होय.'

स्त्री-शुद्रांनी शिक्षण हे धर्मबाह्य व निषिद्ध असलेल्या काळात एका बहुजन समाजातील माळ्याच्या बायकोने शिक्षिका बनणे हे पुण्यासारख्या धर्ममार्तंड, सनातन्याच्या नगरामध्ये आव्हान होते. सावित्रीबाई व त्यांच्या ज्ञानदानाच्या कामात अडथळे आणण्यास व विरोध करण्यास सुरूवात केली. मुलींना शिक्षण देणे म्हणजे त्यांना वाम मार्गाला लावणे आहे, बाया माणसांनी जसै अक्षरे वाचली तर त्या अक्षराच्या अळ्या बनून त्या जेवनाच्या ताटात येतात, असे गैरसमज पसरवल्या गेले.

सावित्रीबाईंनी शाळेत जाऊ नये म्हणून त्यांचा केलेला छळ हा सर्वश्रृत आहे, पण त्या कशालाही वधल्या नाहीत. 'मी माझ्या भगिनींना शिकविण्याचे पवित्र कार्य करीत असताना तुम्ही माझ्यावर शेण अगर खडे फेकित आहात, ती मला फुलांसारखी आहेत. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो.' असे उत्तर दिले जे मानवी कल्याणासाठी त्यांच्या सामाजिक कार्याला सुरूवात करून देणारे ठरले.

१ जानेवारी १८४८ रोजी पुण्याच्या भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून खऱ्या अर्थाने त्यांच्या सामाजिक कार्याला सुरूवात झाली... या कामी सखाराम यशवंत पराजंपे, रावबहाद्दु रजगन्नाथ, सदाशिवराव अण्णाराव भिडे, सदाशिव गोवंडे आदीचे या कामी बरेच सहकार्य लाभले. पूर्व पुण्याची गंजपेठ, वेताळपेठ म्हणजे दलित-मुस्लिम व कष्टकऱ्यांची वस्ती होती. या भागात जोतिराव व सावित्रीबाई रहात असत. याच भागात त्यांनी आपले कार्य सुरू केले. त्यांच्या या शैक्षणिक कार्यामुळे त्यांना घराबाहेर काढण्यात आले. शाळेसाठी जागा नाही, बांधकामासाठी पैसा नाही, लोक मुलींना शाळेत पाठवायला तयार नाहीत, अशा संकटाच्या दुष्टक्रात ते अडकले. शिक्षणाचे कार्य चालत रहावे, प्रतिकूल परिस्थितीमध्येही मुली शाळेत याव्यात यासाठी सावित्रीबाई स्वतः पालकाच्या भेटी घेत, त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, मुलींना विरंगुळा म्हणून खाऊ वाटणे, खेळायला सोडणे, हुशारीबद्दल पारितोषिके देणे इत्यादी गोष्टीबरोबरच शाळेचे वातावरण आरोग्यदायी ठेवण्याकडे व विद्यार्जन व चारित्र्य निर्मितीकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांची शिक्षण व्यवस्था व शाळा याचा विचार करता आजच्या पोटभरू, राजकारणी, स्वार्थी व वरिष्ठांची हांजीहांजी करणाऱ्यांची कीव येते.

शाळेतील उपस्थितीचे प्रमाण टिकवून गळती कमी करणे हे एक अतिदिव्य होते. भत्ता देवून हा प्रश्न सोडवण्यात आला. १८५३ मध्ये ज्या सामाजिक परिस्थितीतून मुले शाळेत येत, त्यांचा बरा-वाईट परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत होता. हा स्वानुभवावर आधारीत सिद्धांत सावित्रीबाईंनी सांगितला. सावित्रीबाईंनी अंत्यत प्रतिकूल परिस्थितीत बहुजन समाजातील एक स्त्री म्हणून घराबाहेर पडून जे शैक्षणिक कार्य मोठ्या जिद्दीने, कौशल्याने व तळमळीने अगदी पहिल्यांदा पार पाडले, त्याला इतिहासात तोड नाही.

१० मे १८४९ पुणे येथिल उस्मान शेख साख्या प्रौढांसाठी शाळेची स्थापना करून अध्यापनाचे कार्य सुरू केले. सावित्रबाई या पहिल्या प्रौढ शिक्षिका व मार्गदर्शिका होत्या. त्यांनी प्रौढ शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी अनेक कवणे रचली. त्यांनी रचलेली कवणे आजही तितकीच प्रभावी व परिणामकारक आहेत.

अभिमानाने जगण्यासाठी, शिकून घ्या, जा शाळेला ।

अशा प्रकारच्या कवणातून त्यांनी प्रौढ शिक्षणाचे महत्त्व समाज मनावर बिंबवले. सर्वांगीण विकास, भावनिक, सामाजिकतेचा विकास, शिक्षण आणि नीतिशिक्षण हे एकात्म असावे, या आधुनिक वाटणाऱ्या उद्दिष्टांचा स्पष्ट उल्लेख सावित्रबाईंनी त्या काळात केला. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट सांगताना त्या म्हणतात-

शिक्षणाने मनुष्यत्व | पशुत्व हटते।


शिक्षणात नीतिशिक्षण असावे, या संदर्भात त्या म्हणतात-

मुलाबाळांना शिकवू, आपण सुद्धा शिकू ।

विद्या घेऊन, ज्ञान वाढवून, नीती, धर्म शिकू ।

१८४९-१८५० या काळात पुणे, सातारा व नगर जिल्ह्यात त्यांनी शाळांची सुरुवात केली व त्यापैकी काही शाळांमध्ये स्वतः अध्यापनाचे कार्य केले. त्यांच्या शिक्षणाच्या कार्यास समाजाबरोबरच घरातूनही तीव्र विरोष होता. पण त्यांनी त्याची पर्वा न करता शुद्र-अतिशूद्र व स्त्री शिक्षणासाठी १८४९ मध्ये पतीसोबत गृहत्याग केला.

बालविवाह, बालाजरठ विवाह, विधवा पुर्नविवाहास विरोध, विधवांचे केशवपन अशा अनेक समस्यांनी स्त्रियाँ अस्त होत्या. बालविवाहाची प्रभा आणि विधवांच्या पुर्नविवाहास बंदी यामुळे अल्पवयात विधवा झालेल्या मुलींना भयावह परिस्थितीत जगावे लागत होते. विधवांच्या वासनांचे दमन करण्यासाठी त्यांना निकृष्ट आहार दिला जात असे. इतके करूनही गर्भधारणा झालीच तर त्यांना जीवन संपविण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना महात्मा ज्योतिराव फुलेंनी केली व त्यात सावित्रीबाईंनी संगोपानाचे कार्य केले. काशिबाई नावाच्या ब्राह्मण विधवेस आत्महत्येपासून म. फुल्यांनी परावृत केले व सावित्रीबाईंनी आईच्या ममतेने तिचे बाळंतपण केले. जातीपातिची बंधने झुगारून काशीबाईच्या अनौरस पुत्राला दत्तक घेतले.



'विधवानो इथे गुप्तपणे व सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मुलं न्यावे अन्यथा इथे ठेवावे, हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्या मुलांची काळजी हा अनाथ आश्रम घेईल.' असे भित्तीपत्रक पुण्यात लावण्यात आले. या बालहत्या प्रतिबंधक गृहाच्या माध्यमातून अनेक विधवा व त्यांच्या अनौरस बालकाचे प्राण त्यांनी वाचवले.

१८५५ मध्ये शेतकरी व शेतमजूर यासाठी रात्रशाळांची स्थापना करून शिक्षणापासून वंचित लोकांना प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. त्या शाळांमध्ये स्वतः अध्यापन करून शिक्षणाची ज्ञानगंगा त्यांच्यापर्यंत पोहचवली.

१८६० पासून महाराष्ट्रात दुष्काळाने थैमान घातले होते, भुकेच्या खाईत मानवतेचे, संस्कृतीचे संकेत गळून पडतात, धडपड चालते ती जीव वाचवण्याची. माणूस पशुतेच्या पातळीवर येतो. संकटात सापडलेल्या या दुर्देवी बचावाचे कार्य सावित्रीबाई व ज्योतिबांनी हाती घेतले. रंजल्या गांजल्यांची सेवा करणे हे जीवनाध्येय होते. धनिकांच्या औदार्यबुद्धीला आवाहन करून जमेल तेथून जमेल ती मदत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. दुष्काळग्रस्तांच्या हाताला काम व पोटाला अन्न पुरावावे अशी इंग्रज सरकारकडे मागणी केली. १८७७ साली किमान मुलांना जगवण्यासाठी सत्यशोधक समाजाच्या वतीने 'व्हिक्टोरिया बालकाश्रम' ची स्थापना करण्यात आली.

कृतिशील समाज क्रांतीकारक सावित्रीबाई व जोतिबांनी धनकवडी येथे दोन ते बारा वर्षे वयोगटातील मुलांसाठी एक आश्रम स्थापन केला. दोन हजार मुलांना त्यांनी दुष्काळांच्या दाढेतून बाहेर काढले. सावित्रीबाई जातीने या आश्रमाची व्यवस्था पहात होत्या. १८७७ च्या दुष्काळात साक्षात अन्नपूर्णा बनून दुष्काळ पिडीतांना त्यांनी आश्रय दिला. अन्नछत्र सुरू केले. कोरड्या अध्यात्मिक ज्ञानापेक्षा हा प्रत्यक्ष अध्यात्मयोग हजार पटींनी श्रेष्ठ होता. दीन-दुबळे व पीडितांना मायेची छाया देवून सावित्रीबाई जगन्माता बनल्या.

अनेकदा बालविवाहाच्या प्रथेमुळे, तरुण वयातच पतिनिधनाचे दुःख/ स्त्रियांच्या वाट्याला येत असे. त्यानंतर त्यांना अतिशय अपमानित, उपेक्षित, हीन आयुष्य जगावे लागत असे. म्हणून त्यांचा पुर्नविवाह व्हावा यासाठी सावित्रीबाईंनी 'विधवा विवाह सभेची' स्थापना केली.

केशवपनाच्या अनिष्ट प्रथेला जेरबंद करण्यासाठी केशवपनाच्या प्रथेतून स्त्रियांवर केल्या जाणाऱ्या अत्याचाराचे स्वरूप न्हावी बांधवांना समजावून सांगून, त्यांनी त्यांचा संप घडवून आणला. या संपाच्या वेगळ्यापणातच त्यांचे मोठेपण दडले आहे.

बालहत्या प्रतिबंधक गृह हे ठामपणे चालवणे हे विलक्षण धैर्य तर होतेच पण त्यातीलच एक मूल स्वतः दत्तक घेणे ही कृतीशिलतेची आणखी एक महत्त्वाची पायरी होती, शिक्षण परिषदा, विचारप्रसार, रुग्णसेवा, बालहत्या, प्रतिबंधक गृह, दुष्काळग्रस्तांची देखभाल इत्यादी कामात त्या जोतिबांच्या बरोबरीने सोबत होत्या. निपुत्रीकतेची खंत न करता मुलगा दत्तक घेवून, त्याच्या विवाहातून मिश्र विवाहाची कृती करून त्यांनी एक नवे पाऊल टाकले.

संकटे एकटी दुकटी येत नाहीत. दुष्काळापाठोपाठ महाराष्ट्रात प्लेगची साथ पसरली. या आजाराने महाराष्ट्रात धुमाकुळ घातला. या काळात सावित्रीबाईंचे कार्य आणि धैर्य अद्वितीय होते. मदतीसाठी त्यांनी इंग्रज मिशनऱ्यांशी संपर्क साधला. रोग पसरू नये म्हणून काय करावे या बाबत त्यांनी जनजागृती केली. रोग्यांसाठी तात्पुरते हॉस्पीटल असावे, असा विचार त्यांचा मनात आला. त्यांचे व्याही ग्यानोबा ससाणे यांच्या वानवडी- घोरपडी परिसरातील माळरानावरच्या जागेत हॉस्पीटल उघडण्यात आले. त्यांनी त्यांच्या दत्तक मुलगा यशवंतास मदतीसाठी बोलावून घेतले.

रोगाची साथ आटोक्यात येत नव्हती. सावित्रीबाई अथक परिश्रम करीत होत्या. त्यांची सतत भ्रमंती चालू होती. मुंढवे येथे प्लेगने ठाण मांडले होते. हरिजन वस्तीतल्या पांडूरंग बाबाजी गायकवाड या मुलाला प्लेगने विळखा घातला होता. सावित्रीबाईंनी खूप धडपड केली. स्वतःच्या पाठीवर घेवून त्यांनी हॉस्पीटल गाठले पण वाटेतच सावित्रीबाईंनाच प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ रोजी रात्री ९ वाजता त्यांचा थकला भागला देह मृत्यूच्या अधीन झाला. एक तेजस्वी तारका निखळली. बहिष्कृत तिरस्कृत जीवन होरपळून जगणाऱ्या सावित्रीबाईंनी दीनदलितांचे जीवन सुखावह करण्याचा प्रयत्न अंतिम श्वासापर्यंत केला.

त्यांचे प्रकाशित विस्तृत चरित्र कल्पित आहे, असत्य आहे अशी राळ उठवण्यात आली. एका स्त्रीने, तेही माळी समाजाच्या यशस्वीपणे शाळा चालवून स्त्री, शुद्र यांना ज्ञानदान करणे, प्रौढ स्त्रियांसाठी रात्रशाळा चालवणे पति, निष्पाप विधवांच्या मुलांना स्वतःच्या ओटीत घेवून या विधवांचे अश्रू पुसावेत, म. फुलेंच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचे सार्थ नेतृत्त्व करणे, पुरोहितांशिवाय सत्यशोधक समाज पद्धतीप्रमाणे लग्न कार्ये करणे, त्यासाठी विरोध, दावे, खटले यांचा सामना करणे, दुष्काळात मरणोत्मुख पिडीतांच्या तोंडात घास भरवणे व प्लेगच्या साथीत दीन दुबळ्यांची शुश्रुषा भिकरणे हे सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वामधील विविध विलक्षण असे पैलू आहेत. हे सर्व पैलू म्हणजे प्रखर प्रकाशाचे झोतच होत.

मृत्यू हा मानवी शरीराचा अंत करतो पण तो विचारांचा अंत करू शकत नाही. त्यांचे विचार, समर्पण समाजप्रती तळमळ व त्यांची ग्रंथ संपदा ही शतकानुशतकांची शिदोरी ठरते.

समाजात जेव्हा जेव्हा अज्ञानरूपी अंधःकार माजतो, समाज अस्थिर होतो, मन, मेंदू सैरभैर होतो, अशा वेळी सावित्रीबाईसारख्यांचे जीवन कार्य व विचार व संस्कार हे दिपस्तंभाचे कार्य करीत असतात.

सावित्रीबाईंच्या कार्याची इतिहासात नोंद आहेच. तसेच त्यांची ग्रंथसंपदा देखील त्यांच्या संवदेनशील, सर्जनशील, विविधांगी विचार करण्याची प्रतिभा असणाऱ्या सावित्रीबाईंचे दर्शन घडवते.

स्त्री ही अबला नसून ती किती सामर्थ्यवान असते हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. पतीच्या समाजकार्यात स्वतःला पूर्णपणे झोकून देणाऱ्या सावित्रीबाई ह्या खऱ्या अर्थाने आदर्श अर्धांगीनी होत. म. फुले व सावित्रीबाई फुले यांच्या सहजीवनाचा बोध समाजाने घेतला तर समाजात निर्माण होणाऱ्या अनेक समस्या सहज सुटतील, यात शंकाच नाही.

सावित्रीबाईंनी तह्यात जोतीरांवाना दिलेली साथ अजोड होती. त्यांनी घालून दिलेला स्त्री पुरुष समता आणि शांततामय सहजीवनात आदर्श कालातीत होता. शिक्षण, सामाजिक- न्याय, जाती निर्मलून, या क्षेत्रातील त्यांचे योगदान इतिहासाबरोबरच वर्तमानालाही उजळून टाकणारे असे अतुलनीय योगदान आहे.

सावित्रीबाईंचा हा वैचारिक वसा सदैव आपल्यासाठी प्रेरक व मार्गदर्शक राहील, यात शंकाच नाही.

## सावित्रीबाई फुले यांचे सेवाभावी प्रयत्न

१८४८ मध्ये सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे पती ज्योतिबा फुले यांच्या मदतीने केवळ १७ वर्षांच्या असताना दलित आणि महिलांसाठी शाळा काढली. त्यावेळी त्यांच्या शाळेत फक्त ९ मुली होत्या. सावित्रीबाई फुले शाळेत जाताना लोकांनी गायीचे खत, चिखल आणि इतर पदार्थ फेकले असे मानले जाते, परंतु यामुळे तिचा आत्मविश्वास डळमळला नाही. अशा परिस्थितीत ती शाळेत नेहमी साडी नेसायची. रस्त्यावर घाण आणि खत टाकून लोकांनी विरोध केल्यावर ती शाळेत जायची आणि मुलींना दुसरी साडी घालून शिक्षण देत असे. शिवाय, सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या कठोर परिश्रम आणि समर्पणामुळे परिसरात सुमारे १८ मुलींच्या शाळा निर्माण झाल्या. याशिवाय, पुण्यातील सावित्रीबाई फुले यांच्या मुलींची शाळा ही देशातील पहिली मुलींची शाळा म्हणून ओळखली गेली आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांना देशातील पहिल्या मुलींच्या शाळेच्या संचालिका आणि प्रमुख म्हणूनही ओळखले जाते. त्यांचे पती ज्योतिबा फुले हे देखील सामाजिक सुधारणा चळवळीत प्रमुख सहभागी होते. एकत्र असताना त्यांनी नेहमीच समाजातील शोषितांसाठी आवाज उठवला. त्याशिवाय, सावित्रीबाईंच्या सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांबद्दल बोलायचे झाले तर, १८५३ मध्ये त्यांनी बलात्कारानंतर गर्भवती झालेल्या महिलांसाठी निषेध गृह बांधले. त्याचबरोबर विधवा पुनर्विवाहाची प्रथा समाजात व्यवहार्य झाली असेल, तर त्यामागे सावित्रीबाई फुले यांचा

मोठा हात होता. त्यांचे पती, ज्योतिबा फुले यांच्या निधनानंतर, त्यांनी सत्यशोध समाजाची स्थापना केली, ज्याची स्थापना त्यांनी १८७३ मध्ये सत्यशोधनासाठी समर्पित समुदायाची स्थापना करण्याच्या प्राथमिक हेतूने केली. ज्योतिबा फुले हयात असतानाच १८५४ ते १८५५ या काळात सावित्रीबाईंनी देशातील महिला आणि दलितांसाठी साक्षरता प्रकल्प सुरू केला. देशातील पहिली शेतकरी शाळा स्थापन करण्याचे श्रेयही सावित्रीबाई फुले यांना जाते. त्याशिवाय सावित्रीबाई फुले यांनी भ्रूणहत्या बंद करण्यासाठी अनेक राष्ट्रीय मोहिमांचे नेतृत्व केले. त्यांच्या सामाजिक सुधारणा आणि परिवर्तनाच्या कार्यामुळे त्यांना ब्रिटिश सरकारकडून मान्यता मिळाली.

## सावित्रीबाई फुले यांचे महान विचार

सावित्रीबाई समाजसुधारक आणि शिक्षिका असण्यासोबतच कवयित्री होत्या. त्यामुळे त्यांना मराठी कवितेचे शिखर मानले जाते. याशिवाय त्यांनी काव्य फुले आणि बावनकशी सुबोध रत्नाकर या ग्रंथांचे प्रकाशन केले. त्याशिवाय, सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक जाणिवेशी संबंधित स्त्रियांच्या प्रश्नांना नेहमीच महत्त्व दिले आहे. परिणामी, त्याचा असा विश्वास होता की-

- शिक्षण हेच महिला आणि दलितांच्या सक्षमीकरणाचे एकमेव साधन आहे.
- समाजाला पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचवायचे असेल तर अस्पृश्यता दूर करण्यासाठी स्त्रियांना शिक्षित केले पाहिजे.
- लहान मुलींच्या हत्या थांबवल्या तरच भारत समृद्ध होऊ शकेल.
- माणुसकीच्या नावाखाली महिला आणि अत्याचारित लोकांचे दबंग विनाशकारी असू शकते.
- ज्या पुरुषांना स्त्रिया आपल्यापेक्षा कमी दर्जाच्या वाटतात त्यांनी हे लक्षात ठेवावे की त्यांचा जन्म स्त्रीच्या पोटातून झाला आहे.

## लोकप्रिय संस्कृतीत

- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ही त्यांच्या जीवनावर आधारित भारतीय नाटक दूरदर्शन मालिका २०१६ मध्ये डीडी नॅशनलवर प्रसारित झाली.
- सावित्री ज्योती ही मालिका सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आणि कार्यावर आधारित आहे. ही मराठी नाटक दूरदर्शनमालिका २०१९-२० मध्ये सोनी मराठीवर प्रसारित झाली.
- त्यांच्या जीवनावर आधारित २०१८ मध्ये सावित्रीबाई फुले या नावाचा कन्नड भाषेत चरित्रपट तयार करण्यात आला.
- २०२१ मध्ये, पुणे विद्यापीठाने फुले यांचा १२.५ फूट आकाराचा कांस्य पुतळा तयार केला, त्याचे उद्घाटन २०२२ मध्ये होणे अपेक्षित आहे.

## सावित्रीबाई फुले यांची काव्य रचना

१९ व्या शतकात जरी मनुचे प्रती राज्य म्हणून संबोधिले गेलेल्या पेशवाईचा अंत झाला असला तरी समाजावरील त्याचा पगडा कायम होता. या काळातील समाजाचे जीवन जुन्या परंपरेच्या ठराविक चाकोरीत बंदिस्त होते. अप्रत्यक्षरित्या समाजाचे नियमन आणि संचालन तथाकथित उच्चावर्णीयांकडेच असून बहुजन वर्गास ते मान्य होते. 'शुद्रातिशुद्र' व 'स्त्री' यांचे जीवन 'जैसे थे' म्हणजे दुय्यम, हीन आणि दास पातळीवरच कायम होते. सार्वत्रिक शिक्षणाचा परिणाम सार्वत्रिक स्वरूपाचा

नव्हता. स्त्री समस्या , स्त्रियांची खालावलेली परिस्थिती यांची जाहिरपणे चर्चा सुरू झाली असली तरी अनेक कारणांनी स्त्री मुक्ति आणि विकासासाठी कृतीशील पावले उचलली जात नव्हती. 'स्त्री शिक्षणास' प्रचंड विरोध असून प्रचंड भीती समाजमानसात रूजविण्यात आली होती. अशा या परिस्थितीत बहुजन वर्गातील एक कन्या स्वयंप्रेरणेने शिक्षित होते. सर्वच स्तरातील मानवांना शिक्षित करण्यासाठी कंबर कसते. स्त्रीमुक्ती आणि उद्धार या कार्यासाठी आपले आयुष्य खर्च करते. आपल्यां पतीच्या बहुजन वर्गाच्या उद्धार आणि ज्ञानप्रसार या कार्यात सहचारिणी म्हणून त्याच्या निधनानंतरही कार्यरत राहते. संसर्गजन्य रोगाची साथ पसरली असता स्वतः जातीने लक्ष देऊन अशा रूग्णांची सेवा करतानाच निधन पावते. भारताच्या इतिहासातील अशी ही स्त्री म्हणजे या राष्ट्राच्या पहिल्या स्त्री -शिक्षिका, भारतातील सत्रीमुक्तीच्या आद्य स्त्री-प्रणेत्या 'सावित्रीबाई फुले' यांचे कार्य खरेच अतुलनीय आहे. समाजधुरीण म्हणून सावित्रीबाई फुले यांचे व्यक्तीत्व आणि कार्य आज इतिहासात सर्वश्रुत असले तरी मराठी साहित्याला आद्य काव्यरचनेचे अभिजात लेणेही त्यांनी बहाल केले आहे. निसर्ग आणि कविमनाची जडणघडण साहित्यिक ज्या वातावरणात विकसित होतो, त्या वातावरणाचा परिणाम त्याच्या सर्जनशील, संवेदनशील मनावर होत असतो.

- "बारा बलुती बारा अलुती कितीक जाती जमाती
- शिवारात या सुखे नांदती
- पाऊसपाणी छान पडतसे येती पिके सारी
- विहिरीवर फळेफुले गोजिरी
- गुलजार पक्षी गाती मनोहर फिरती फुलपांखरे
- ऐसा निसर्ग तिथे वावरे"

नायगाव या निसर्गरम्य खेडेगावात जन्माला आलेल्या आणि नऊ वर्षापर्यंतचे जीवन येथेच जगलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या निसर्गविषयक कविता आणि त्यांच्या रचनेतील नैसर्गिक प्रतिमा पाहता त्यांच्या कविमनावर निसर्गाचा सखोल परिणाम लक्षात येतो. निर्सगाच्या सर्जनाप्रमाणेच त्यांचे सहज, सोपे, सुलभ काव्य प्रसवते आणि बहरत जाते. त्यांच्या प्रबोधनात्मक, सामाजिक कार्याप्रमाणे त्यांचे साहित्यिक कार्य मराठी जगताला फार मोलाचे आहे. मराठी साहित्य जगतात महदंबा, मुक्ताई, जनाबाई, बहिणाबाई, वेण्णा- आक्का यासारख्या अनेक संत स्त्रियांनी अभंगाची रचना केली. गवळणी, विरहणी, जात्यावरच्या ओव्यां इ.रचना केल्या. पुढे स्त्रीलेखनाची काव्यपरंपरा ही शिवकालाच्या उत्तरार्धात खंडीत झाल्याचे आढळते. लावणीची शृंगारीकता, राजकारण याचा डोल तिने स्वींकारला नाही. शिवाय सामाजिक बंधनात तिचे अस्तित्व जखडून गेले. स्त्रीलेखनाची ही काव्यपरंपरा १९व्या शतकात सावित्रीबाई फुले यांच्यात काव्यरचनेने पुन्हा प्रवाहित झाली. अर्थात स्त्रीवादी जाणीवा, प्रबोधन यांचा समावेश या काव्यात आहे. पण भक्तीची नव्हे तर आधुनिकतेची ही रचना असल्यासचे आढळते.

## संदर्भ


❖ अमेरिकन मिशनरी सिंथिया फरार यांनी 1829 मध्ये मुंबईत मुलींची शाळा सुरू केली होती. 1847 मध्ये, विद्यार्थी साहित्यिक आणि वैज्ञानिक समाजाने मुंबईच्या गिरगाव परिसरात मुलींसाठी कमलाबाई हायस्कूल सुरू केले. 2016 मध्ये ही शाळा अजूनही सुरू आहे. पेरी चरण सरकार यांनी 1847 मध्ये बारासात या बंगाली शहरात कालीकृष्ण गर्ल्स हायस्कूल नावाची मुलींसाठी शाळा सुरू केली. पारशी समुदाय मुंबईने 1847 मध्ये मुलींसाठी एक शाळा देखील स्थापन केली होती.

- "Sundararaman, T.". सावित्रीबाई फुले पहिले स्मृती व्याख्यान, [२००८]. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद. २००९. ISBN 9788174509499.
- "सावित्रीबाई फुले यांची जयंती". Loksatta. 2022-01-03 रोजी पाहिले.
- पुणे, मंदार गोंजारी, एबीपी माझा (2022-01-03). "नायगावमधील सावित्रीबाईंचं घर, जिथं त्यांचं बालपण गेलं... पाहा घर आणि स्मारकाचे खास फोटो". marathi.abplive.com. 2022-01-03 रोजी पाहिले.
- "शिक्षक दिन 2021 : विशेष प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले;वाचा". Maharashtra Times. 2022-01-03 रोजी पाहिले.